कंत्राटी पदभरती जाहिरात

राष्ट्रीय आयुष अभियान

जिल्हा आरोग्य सोसायटी, पुणे, महाराष्ट्र

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत विविध कार्यक्रम अंतर्गत पुणे जिल्ह्यातील आयुष संस्थेमध्ये खालील कंत्राटी रिक्त पदे भरावयाचे आहेत.

जाहिरात दिनांक २६ / ११ / २०२६

अ. क्र.	पदाचे नाव	कार्यक्रमाचे नाव/ पदस्थापना ठिकाण	पदसंख्या	आरक्षण प्रवर्ग	शैक्षणिक अर्हता	प्रतिमाह मानधन
१	आयुष वैद्यकीय अधिकारी(PG)	NPCDCS (जिल्हा रुग्णालय)	१	खुला-१	MD Ayurved (Kayachikitsa / Panchkarma)	६००००/-
२	योग व निसर्गोपचार तज्ञ	NPCDCS (जिल्हा रुग्णालय)	१	खुला-१	BNYS MCIM/NCIM नोंदणी आवश्यक किंवा M.Sc./B.Sc Yoga or MA Yoga	२८०००/- २००००/-
३	आहारतज्ञ	NPCDCS (जिल्हा रुग्णालय)	१	खुला-१	B.Sc Food & Nutrition /Home Science or PG Diploma in Dietetics after Science Graduation	२००००/-
४	बहुउद्देशीय आरोग्य सेवक (MPW)	Prevention and Management of Osteoarthritis & Musculosceletal Disorder उपजिल्हा /ग्रामीण रुग्णालय	१०	अ.जा-१, अ.ज.-१, विजाअ-१, इमाव-२, एसईबीसी-१, ईडब्ल्यूएस -१, खुला -३	विज्ञान शाखेतून एचएससी परीक्षा उत्तीर्ण किंवा शासनाने घोषित समतुल्य इतर कोणतीही परीक्षा उत्तीर्ण + पी.एच.आय नागपूर यांचेकडून निश्चित केलेला निमवैद्यकीय मुलभूत प्रशिक्षण अभ्यासक्रम/आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय मान्यता स्वच्छता निरीक्षक (*Sanitary Inspector*) किंवा समकक्ष अभ्यासक्रम पूर्ण करून उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. शासकीय अनुभव असल्यास प्राधान्य.	१५०००/-

५	आयुष वैद्यकीय अधिकारी (आयुर्वेद पदवीधर)	Prevention and Management of Osteoarthritis & Musculosceletal Disorder उपजिल्हा /ग्रामीण रुग्णालय	१०	अ.जा-१, अ.ज.-१, विजाअ-१, इमाव-२, एसईबीसी-१, ईडब्ल्यूएस -१, खुला -३	BAMS MCIM नोंदणी आवश्यक शासकीय अनुभव असल्यास प्राधान्य	४००००/-
६	वैद्यकीय अधिकारी (होमिओपॅथी) (PG)	एकात्मिक आयुष रुग्णालय	१	खुला	MD (Homeopathy) शासकीय अनुभव असल्यास प्राधान्य	३००००/-
७	वैद्यकीय अधिकारी (युनानी) (PG)	एकात्मिक आयुष रुग्णालय	१	खुला	MD (Unani Medicine-Moalajit) असल्यास प्राधान्य किंवा MD (Unani Medicine-any	३००००/-
८	वैद्यकीय अधिकारी आयुर्वेद यु.जी	एकात्मिक आयुष रुग्णालय	१	खुला	BAMS शासकीय अनुभव असल्यास प्राधान्य	२८,०००/-
९	योग प्रशिक्षक	एकात्मिक आयुष रुग्णालय	१	खुला	BNYS	२८,०००/-
१०	नर्सिंग स्टाफ (स्त्री)	एकात्मिक आयुष रुग्णालय	२	खुला . १ भजब-१	GNM /Bsc Nursing शासकीय अनुभव असल्यास प्राधान्य	२००००/-
११	नर्सिंग स्टाफ (पुरुष)	एकात्मिक आयुष रुग्णालय	१	खुला	GNM /Bsc Nursing शासकीय अनुभव असल्यास प्राधान्य	२००००/-

<u>अटी व शर्ती:-</u>

१) उपरोक्त पदे हि निव्वळ कंत्राटी स्वरुपाची असुन नियुक्ती कालावधी दि.२९/०६/२०२७ *पर्यंत राहिल.*

२) जाहीरातीतील पदे ही राज्य शासनाचे नियमित पदे नसुन निव्वळ कंत्राटी स्वरुपातील पद आहेत. सदर पदावर कायमपणाचा हक्क राहणार नाही तसेच या पदांसाठी शासनाचे सेवा नियम लागु नाही, तसेच अर्जदाराला शासकीय नियमित सेवेत सामावुन घेणे किंवा शासनामार्फत सेवा संरक्षण किंवा त्यासंबंधी दावा करण्याचा अधिकार राहणार नाही.

३) अर्जदार हा भारतीय नागरिक असावा. संबंधित पदासाठी शारीरीक व मानसिकदृष्टया सक्षम असावा.तसेच अर्जदाराविरुध्द कोणताही फौजदारी गुन्हा दाखल झालेला नसावा.

४) उपरोक्त कंत्राटी पदांकरीता दरमहा एकत्रित मानधन देण्यात येईल.

५) जाहीरातीमधील रिक्त पदांच्या संख्येत व नियुक्ती ठिकाणात बदल होऊ शकतो याबाबतचे सर्व अधिकार अध्यक्ष निवड समिती /जिल्हा आयुष सोसायटी जि.प. पुणे यांनी राखुन ठेवले आहेत. ऐनवेळी मार्गदर्शक सुचनांनुसार पदसंख्येत बदल झालेस त्याबाबत उमेदवारांना आक्षेप घेता येणार नाही.

६) अनुभवी व उच्च शैक्षणिक अर्हता धारकास प्राधान्य दिले जाईल.

७) निवड प्रक्रियेतील पात्र/अपात्र उमेदवारांची यादी, भरती प्रक्रियेची माहिती जिल्हा परिषदेच्या वेबसाइटवर **www.punezp.gov.in** प्रसिध्द करणेत येईल याबाबत कुठलाही स्वतंत्र पत्रव्यवहार उमेदवारांसोबत केला जाणार नाही.

८) निवड यादीतील गुणाक्रमांकाचे आधारे प्राधान्यक्रमाने पदस्थापना दिली जाईल. त्याबाबत उमेदवाराने कोणत्याही दबावतंत्राचा वापर केल्यास सदर उमेदवाराची निवड रद्द करण्यात येईल.

९) सर्व पदांकरिता अर्ज करणाऱ्या उमेदवारांना कमाल वयोमर्यादा ३८ वर्षे असेल. व सध्या कार्यरत असलेल्या राआअ अंतर्गत उमेदवारांना वयाची अट ५ वर्षांकरिता शिथिल राहील.

१०) उपरोक्त पदांकरीता निवड प्रक्रिया ही प्राप्त अर्जाच्या संख्येनुसार छाननी करुन **गुणानुक्रमे** यादी तयार करण्यात येवुन गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल. निवड समितीचा निर्णय अंतिम राहिल.

११) अर्जदाराला कंत्राटी कालावधीमध्ये सोयीनुसार ठिकाण बदलुन मिळण्याची मागणी करता येणार नाही.

१२) भरती प्रक्रिया स्थगित करणे/रद्द करणे /पदभरती प्रक्रियेत बदल करण्याचे सर्व अधिकार अध्यक्ष निवड समिती यांचे स्तरावर राखीव ठेवण्यात आलेले आहेत, याबाबत कोणालाही कोणताही दावा करता येणार नाही.

१३) उमेदवाराने विहीत नमुन्यातील अर्ज, गुणपत्रिका, पदवी प्रमाणपत्र व इतर आवश्यक कागदपत्रांच्या **स्वयं साक्षांकित** छायांकीत सत्यप्रतींसह आपले अर्ज ऑफलाईन पदधतीने दि . **२६/११/२०२६** ते दि. **१०/१२/२०२६** रोजी पर्यंत संध्याकाळी ०५.०० वाजेपर्यंत **सार्वजनिक सुट्टीचे दिवस वगळून** भरून प्रत्यक्ष सादर करणेचे आहेत. प्रक्रिया शुल्क अधिक शासकिय कर अदा केल्यानंतरच उमेदवारांचा अर्ज भरती प्रक्रियाकरिता गृहित धरणेत येईल.

१४) सदर भरतीची प्रक्रिया पुर्ण झालेनंतर भविष्यात जर एखाद्या ठिकाणी कर्मचारी यांनी राजीनामा दिलेमुळे जागा रिक्त झालेस प्रतिक्षा यादीतील मेरिटमधील पुढील उमेदवारास नविन भरती प्रक्रिया न करता नियुक्ती आदेश दिले जातील. सदर अंतिम **प्रतिक्षा** निवड यादी ही तयार झालेनंतर वेबसाइटवर प्रसिध्द झालेनंतर पुढील एक वर्षापर्यंत वैध राहील.

१५) उपरोक्त पदाकरिता अर्ज करणाऱ्या सर्व उमेदवारांकरिता र. रु **५००/-** चा धनाकर्ष *(Demand Draft)* सोबतच्या अर्जाबरोबर सादर करावा.सदर धनाकर्ष **District Integrated Health & Family Welfare Society,Pune** या नावाने असावा आणि अर्जावर एकदम वरच्या बाजूस जोडण्यात यावा. डिमांड ड्राफ्टच्या नावामध्ये,तारखेमध्ये चूक आढळल्यास अथवा खराब असल्यास संबधित उमेदवाराचा अर्ज पद भरतीच्या पुढील प्रक्रिये करिता ग्राह्य धरला जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी. उमेदवारांना एकापेक्षा जास्त पदाकरिता अर्ज करावयाचा असल्यास प्रत्येक अर्जासोबत वेगळा धनाकर्ष जोडणे आवश्यक आहे.

१६) सदर भरती प्रक्रिये करीता अर्ज दि. **१०/१२/२०२६** पर्यंत आवक जावक कक्ष, **जिल्हा आयुष रुग्णालय ,जिल्हा रुग्णालयाशेजारी, औंध ,पुणे** येथे कार्यालयीन वेळेत (शासकिय सुट्टी वगळता) संध्याकाळी ०५.०० वाजेपर्यंत प्रत्यक्ष स्वीकारले जातील. तदनंतर अर्जाची छाननी करुन उमेदवारांची पात्र/अपात्र यादी इ.बाबत सविस्तर तपशिल वेळोवेळी पुणे जिल्हा परिषदेच्या वेबसाईटर **www.punezp.gov.in** प्रसिध्द करणेत येईल.

१७) उमेदवारांना वेळोवेळी दिल्या जाणाऱ्या सर्व सुचना, गुणवत्ता यादी जिल्हा परिषदेच्या वेबसाईटवर प्रसिध्द करणेत येतील.

राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत विविध पदांच्या पदभरतीच्या अनुषगाने राबविणेची प्रक्रिया पात्र उमेदवारांना पुढील तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे गुण देण्यात येणार आहेत.

विवरण	तपशील	अधिकतम गुण
पदासाठी आवश्यक Qualifying exam मधील गुण (अंतिम वर्षाच्या गुणाच्या आधारे)	मिळालेल्या एकूण गुणांच्या टक्केवारीचे ५० प्रमाणे Proportion काढावे. (उदा. ६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे ५०% प्रमाणे Proportion = ६०*५०/१००=३०)	५० गुण
पदासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हतेपेक्षा अधिक शैक्षणिक अर्हता असल्यास (संबंधित विषयामध्येच अधिकची शैक्षणिक अर्हता असल्यास विचारात घ्यावी.	अधिकतम २० गुण द्यावेत. मिळालेल्या एकुण गुणांच्या टक्केवारीचे २० प्रमाणे Proportion काढावे (उदा. १. Staff Nurse पदाची आवश्यक शैक्षणिक अर्हता पूर्ण करुन अतिरिक्त B.Sc (Nursing) हि शैक्षणिक अर्हता पूर्ण केलेल्या उमेदवाराने अर्ज केला असल्यास उमेदवारांस B.Sc (Nursing) च्या अंतिम वर्षात ६०% गुण प्राप्त असल्यास त्याचे २०% प्रमाणे Proportion =६०*२०/१००=१२ गुण)	२० गुण
संबंधित पदाशी निगडीत अनुभव असल्यास	प्रत्येक १ वर्षासाठी ६ गुण द्यावेत. (१ वर्षाकरिता ६ गुण, जास्तीत जास्त ३० गुण)	३० गुण

१. यानुसार गुणांकन केल्यावर गुणानुक्रमांनुसार अधिकतम गुण मिळालेल्या उमेदवारांची गुणवत्ता यादी संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येईल. सदर यादीबाबत आक्षेप असल्यास ते सादर करण्याकरीता पाच दिवसाची मुदत देणेत येईल. आक्षेपसोबत त्यांच्या पृष्टयर्थ योग्य पुरावे सादर करण्यास सुचित करणेस सुचित करणेत येईल.

२. अशा प्रकारे प्राप्त आक्षेपांचे निराकरण करुन त्यानुसार अंतिम गुणवता यादी तयार करणेत येईल व ती जिल्हा परिषद, पुणे या वेबसाईटवर प्रसिध्द करणेत येईल, व त्यानुसार नियुक्ती आदेश देण्यात येतील.

३. नियुक्ती आदेश दिलेल्या उमेदवारांना रुजू करुन घेण्यापूर्वी सर्व आवश्यक प्रमाणपत्रे, शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्रे इतर आवश्यक कागदपत्रे यांची तपासणी व खात्री करण्याची जबाबदारी संबंधित संस्था प्रमुख यांची राहील.

४. भरतीप्रक्रिये संदर्भातील मार्गदर्शक सुचना वेळोवळी जिल्हा परिषद, पुणे या वेबसाईटवर प्रसिध्द करणेत येतील, कोणत्याही उमेदवाराने जिल्हा कार्यालयास प्रत्यक्ष संपर्क साधु नये.

५. उपरोक्त पदसंख्येत व पदांच्या ठिकाणांमध्ये ज्या त्या परिस्थितीनुरूप बदल होण्याची शक्यता असते.

६. संबंधित उमेदवारांनी शासकीय /खाजगी अनुभव प्रमाणपत्रामध्ये नमुद केलेल्या कालावधीसाठी संबंधीत संस्थांनी अदा केलेल्या मानधनाची पावती किंवा बँक स्टेटमेंट जोडणे आवश्यक आहे अन्यथा उमेदवारास अपात्र करण्यात येईल याची नोंद घ्यावी..

❖ **खालीलप्रमाणे आवश्यक असलेल्या मुळ कागदपत्रांच्या साक्षांकीत केलेल्या छायांकीत प्रती अर्जाच्या सोबत जोडाव्यात.तसेच नियुक्तीवेळी उमेदवारांची सर्व मूळ कागदपत्रे तपासली जातील.मूळ कागदपत्रे व अर्जासोबत सादर कागदपत्रे यांचेमध्ये त्रुटी/असमानता आढळून आल्यास नियुक्ती रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी.**

१) **शैक्षणिक अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे व गुणपत्रिका**
२) शाळा सोडल्याचा/जन्म तारखेचा दाखला
३) पासपोर्ट आकाराचा फोटो
४) नावात बदल असलेस गॅजेट (राजपत्र) जोडणे
५) लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र
६) प्रमाणित केलेले शासकीय/खाजगी अनुभव प्रमाणपत्र (मानधनाचे प्रमाणपत्र किंवा बँक स्टेटमेंट सहित)
७) वैद्यकीय अधिकारी व नर्सिंग स्टाफ पदाकरिता कौन्सिल नोंदणी ,नुतनीकरण प्रमाणपत्र आवश्यक
८) जातीचा दाखला व नॉनक्रिमिलेयर प्रमाणपत्र

***

अध्यक्ष, निवड समिती तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, पुणे

अर्जाचा नमुना

..... या पदासाठी अर्ज

पासपोर्ट आकाराचा उमेदवाराचा नजिकचा साक्षांकीत फोटो

प्रति,

मा. जिल्हा आरोग्य अधिकारी,
जिल्हा परिषद, पुणे

१) **संपुर्ण नाव** (as per SSC certificate) **मराठी** **इंग्रजी (कॅपीटल लेटर)**

- आडनाव:- ....
- स्वत:चे नाव ....
- वडीलांचे/पतीचे नाव ....
- आईचे नाव ....

२) पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता पिनकोडसहीत:-.....

.....

.....

३) **मोबाईल क्रं:-**१) ..... मेल आयडी.....
२)

४) **जन्मतारीख:-**..... दि. ३१/०५/२०२६ रोजीचे वय:-.....वर्षे.....दिवस

५) कोणत्या प्रवर्गातुन अर्ज केलेल्या आहे त्याप्रमाणे खालील चौकटीमध्ये फक्त एकावरच अशी ( ) खुण करावी.

अ.जा.	अ.ज.	वि.जा.अ.	भ.ज.ब.	भ.ज.क.	भ.ज.ड.	वि.मा.प्र.	इ.मा.व.	आर्थिक मागास प्रवर्ग	खुला
SC	ST	VJ-A	NT-B	NT-C	NT-D	SBC	OBC	EWS	Open

६) शैक्षणिक अर्हता:-

अ. क्र.	उत्तीर्ण केलेली परिक्षा	विद्यापीठ/मंडळाचे नाव	अंतिम परिक्षा उत्तीर्ण झाल्याचे वर्ष	किती पैकी गुण उदा:-३५०/५०० प्राप्तगुण/पैकी	टक्केवारी	श्रेणी

७) अनुभव:- (केवळ शासकिय/निमशासकिय / खाजगी)

संस्थेचे नाव	**संस्थेचा प्रकार (शासकिय/निमशासकिय / खाजगी)**	**कालावधी**		**एकुण वर्षे**	
		पासुन	पर्यंत	वर्षे	महिने

८) आपणांविरुध्द न्यायप्रविष्ट प्रकरण, फौजदारी, शिस्तभंगाविषयक प्रकरण वा तत्सम इत्यादी कारवाई चालु आहे काय? चौकटीमध्ये अशी खुण करावी

होय	नाही

होय असल्यास थोडक्यात तपशिल द्यावा.

.....

.....

९) अर्जासोबत खालील (छायांकीत) सत्यप्रती जोडलेल्या आहेत.

१) .....

२) .....

३) .....

४) .....

५) .....

६) .....

७) .....

८) .....

९)

१०) अर्जदार महाराष्ट्राचा अधिवासी आहे काय ? **होय/नाही**

११) **अर्जदार सदयस्थितीत राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत कार्यरत आहे काय?** **होय/नाही**

असल्यास मुळ कार्यालयाचे नाव व पदनाम .....

.....

मी असे प्रमाणित करतो/करते की, वर नमुद केलेली माहिती खरी असुन, ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करणेत येईल आणि माझे विरुध्द कायदेशीर कारवाई होईल याची मला जाणीव आहे.

अर्जदाराची सही/-

अर्जदाराचे नाव: